9/15/25, 11:39 AM about:blank

लोकमत

# रुग्ण मृत्यूप्रकरणी प्रतिज्ञापत्रास दिरंगाई; केडीएमसीला मानवाधिकारचा १० हजार दंड

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : महिला रुग्णाच्या मृत्यू प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान प्रतिज्ञापत्र सादर करण्यात कल्याण-डोंबिवली महापालिका (केडीएमसी) प्रशासनाने दिरंगाई केली. याबाबत संताप व्यक्त करत मानवाधिकार आयोगाचे अध्यक्ष निवृत्त न्यायमूर्ती अनंत बदर यांनी महापालिकेला १० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे.

केडीएमसीच्या रुक्मिणीबाई रुग्णालयात उपचारासाठी आलेल्या अत्यवस्थ महिला रुग्णावर योग्य उपचार झाले नाही. तसेच उपचारासाठी दुसऱ्या रुग्णालयात जाण्याकरिता वेळेवर रुग्णवाहिका देण्यात आली नाही. वैद्यकीय उपचारांमध्ये दुर्लक्ष झाल्याने तिचा मृत्यू झाला. या प्रकरणी मानवाधिकार आयोगाने सुमोटो दाखल करून घेत कल्याण-डोंबिवली महापालिकेचे आयुक्त, राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव यांना अहवाल सादर करण्याचे व सुनावणीसाठी हजर राहण्याचे निर्देश दिले होते. मात्र, सुनावणीदरम्यान राज्यातर्फे सहायक अधीक्षक त्यांच्या अधिकाऱ्यांसह उपस्थित राहिले व त्यांनी हे रुग्णालय महापालिकेच्या अखत्यारीत असल्याचे स्पष्ट केले. मात्र, महापालिकेतर्फे हजर असलेल्या वकिलाने प्रतिज्ञापत्र तयार असून, त्यावर संबंधित अधिकाऱ्यांची स्वाक्षरी झाली नसल्याचे आयोगाला सांगितले. ज्याप्रमाणे महिला रुग्णाच्या उपचाराकडे दुर्लक्ष केले, त्याचप्रमाणे आयोगाकडेही दुर्लक्ष केल्याप्रकरणी ताशेरे ओढत केडीएमसीला १० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. दंडाची रक्कम महापालिका आयुक्तांनी महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाला देण्याचे निर्देश आयोगाच्या अध्यक्षांनी दिले आहेत.



## आयोगाचे काय आहेत निर्देश?

१. या प्रकरणाची पुढील सुनावणी २७ नोव्हेंबर रोजी होणार असून, तत्पूर्वी दंडाची रक्कम जमा न केल्यास महाराष्ट्र जमीन महसूल संहितेनुसार दंड वसुलीसाठी जिल्हाधिकाऱ्यास निर्देश दिले जाणार आहेत.

२. तसेच आदेशांचे उल्लंघन केल्याबद्दल संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध खटला दाखल केला जाईल, याची केडीएमसीने नोंद घ्यावी, असे सक्त निर्देश आयोगाचे अध्यक्ष न्या. बदर यांनी दिले आहेत.

Mumbai Main
Page No. 9 Sep 13, 2025
Powered by: erelego.com

about:blank 1/1